संदर्भ क्र. विविमं/२०२३–२४/३३४ **अत्यंत महत्त्वाचे – स्मरणपत्र** दिनांक : २९/०४/२०२४

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक/विभागप्रमख,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित
सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था,
विद्यापीठ परिसरातील सर्व शैक्षणिक विभाग, पुणे.

**विषय : स्वामी विवेकानंद युवा सुरक्षा योजनेबाबत...**

**संदर्भ :** **१. उच्च व तंत्र शिक्षण विभाग,शासननिर्णय क्र. संकीर्ण २०२१/प्र.क्र. १४/वि शि ५, दि. १६ ऑक्टोबर, २०२३**
**२. उच्च व तंत्र शिक्षण विभाग,शासननिर्णय क्र. संकीर्ण २०२१/प्र.क्र. १४/वि शि ५, दि. २८ नोव्हेंबर, २०२३**
**३. उच्च शिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य यांचे उशिसं/विवि/२०२३/मवि–१/१६२४३, दि. ०६ डिसेंबर, २०२३**
**४. या विभागाचे विविमं/२०२३–२४/४००, दि. २९/१२/२०२३ चे पत्र.**

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भ क्र. १ अन्वये शासन निर्णयानुसार राज्यातील अकृषी विद्यापीठे तसेच संलग्नित महाविद्यालय/परिसंस्थेतील विद्यार्थ्यांसाठी ऐच्छिक स्वरूपाची विद्यार्थी वैयक्तिक अपघात विमा (Personal Accident Insurance) तसेच विद्यार्थी वैद्यकीय विमा (Medical Insurance) योजना लागू करण्यात आली आहे.

उपरोक्त संदर्भ क्र. २ अन्वये शासन निर्णयानुसार राज्यातील अकृषी विद्यापीठे तसेच संलग्नित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी लागू केलेल्या सदर विद्यार्थी वैयक्तिक अपघात विमा (Personal Accident Insurance) तसेच विद्यार्थी वैद्यकीय विमा (Medical Insurance) योजनेचे ''स्वामी विवेकानंद युवा सुरक्षा योजना'' असे नामकरण करण्यात आले आहे.

सदर ऐच्छिक स्वरूपातील 'स्वामी विवेकानंद युवा सुरक्षा योजना' दराबाबतची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | कंपनीचे नाव | विद्यार्थी वैयक्तिक अपघात विमा १ लक्ष साठी प्राप्त न्युनतम दर (रूपये) | विद्यार्थी वैयक्तिक अपघात विमा ५ लक्ष साठी प्राप्त न्युनतम दर (रूपये) | विद्यार्थी वैद्यकीय विमा रू. २ लक्ष साठी प्राप्त न्युनतम दर (रूपये) |
|---|---|---|---|---|
| १. | ICICI Lombard Insurance Company Ltd | २० | – | – |
| २. | National Insurance co. Ltd. | – | ६२ | – |
| ३. | ICICI Lombard Insurance Company Ltd | – | – | ४२२ |

उपरोक्त संदर्भ क्र. ४ अन्वये आपल्या महाविद्यालय/परिसंस्था/विभागाच्या सर्व विद्यार्थ्यांना याबाबत अवगत करण्याबाबत आपणांस कळविण्यात आले आहे.

या पत्राद्वारे आपणांस पुन:श्च कळविण्यात येते की, **'स्वामी विवेकानंद युवा सुरक्षा योजने'ची माहिती आपल्या महाविद्यालय/परिसंस्था/विभागाच्या प्रवेश माहिती पुस्तिकेत, माहितीपत्रक, प्रवेशासंबंधीच्या तत्सम प्रकाशनांद्वारे व आपल्या संकेतस्थळावर प्रवेशासंदर्भातील माहिती समवेत, याचबरोबर प्रवेशाच्या ठिकाणी, मुख्य सूचना फलकावर तसेच विद्यार्थी एकत्र येत असतात. (उदा. ग्रंथालय/वाचनकक्ष/वर्गखोल्या/विश्रांतीगृह/उपहारगृह/वसतिगृह) अशा दर्शनीय भागात प्रदर्शित करुन सर्व विद्यार्थ्यांना याबाबत अवगत करावे**. या संबंधीचे शासन निर्णय आपल्या माहितीसाठी व उचित कार्यवाहीसाठी सोबत जोडले आहे.

...२...

शासन निर्देशानुसार सदर स्वामी विवेकानंद युवा सुरक्षा योजनेचे नमूद तक्त्यातील विद्यार्थी वैयक्तिक अपघात विमा (Personal Accident Insurance) तसेच विद्यार्थी वैद्यकीय विमा (Medical Insurance) योजनेसंदर्भात सर्व विद्यार्थ्यांना अवगत करण्याबाबत संबंधितास सूचित करावे. कळावे, ही विनंती.

सोबत : वरीलप्रमाणे.

(डॉ. अभिजीत कुलकर्णी)<br>
संचालक, (अतिरिक्त कार्यभार)<br>
विद्यार्थी विकास मंडळ